**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. भोला हुकूमचंद तांबोळी,
४२३, सोमवार पेठ, ससून क्वार्टर्स, — अपीलकर्ता
पुणे - ४११ ००१

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
उप सचीव, सामान्य प्रशासन विभाग, — उत्तरवादी
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
श्री. मि.वा.गेडाम

जन माहिती अधिकारी तथा
अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
श्री. गो.आ.लोखंडे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.६.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३. | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. भोला हुकूमचंद तांबोळी, ४२३, सोमवार पेठ, ससून क्वार्टर्स, पुणे - ४११ ००१<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उप सचीव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ श्री. मि.वा.गेडाम<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ श्री. गो.आ.लोखंडे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.३.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**<br><br>सफाई कामगारांची सेवाविषयक व अन्य प्रलंबित प्रश्नांबाबत केलेल्या कार्यवाहीची सहा महिन्यापासूनची माहिती | |

## <u>विवेचन</u>

राज्यातील सफाई कामगारांच्या प्रश्नासंबंधात श्री. भोला हुकूमचंद तांबोळी, पुणे जिल्हा सचीव, अखिल भारतीय सफाई मजदूर कॉंग्रेस यांनी जन माहिती अधिकारी तथा अवर सचीव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे सफाई कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत पूर्ततेची मागणी करणारी माहिती मागितली होती. 'आपल्या कार्यालयाच्या कार्यप्रणालीत मागासवर्गीयांचे कल्याण करण्यासाठी आपले कर्तव्य व कार्य काय,' परिपत्रक दि. १.१०.२००३

मधील मुद्दा क्र.(ब) हे स्वयंस्पष्ट असल्याने आता पुन्हा सामान्य प्रशासन विभाग (सेवा) कडे विचारणे म्हणजे तो आपल्या व आमच्या विद्वत्तेचा निव्वळ मुर्खपणा ठरणार नाही का ? तरी योग्य तो खुलासा करताना नेमके काय पाऊल उचलावे हे पहिल्यांदा आपण समजून घ्या व नंतर आम्हाला व्यवस्थित समजून सांगा की खरी भानगड काय ? की महाराष्ट्राचे राज्यपाल यांनाही काय समजले नाही. केवळ आपल्याच विभागातील अधिकारी अतिशय बुध्दिवंत आहेत ? अशी तर आपली समजुत नाही ना ? असल्यास किंवा नसल्यास कृपया माहिती मिळावी,' असे विविध स्वरुपाचे दहा प्रश्न त्यात विचारले आहेत. जन माहिती अधिकाऱ्यांनी यातील काही मुद्दयांबाबत स्पष्टीकरणात्मक पत्र श्री. तांबोळी यांना पाठविले. त्याने समाधान न झाल्याने श्री. तांबोळी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उप सचीव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अपील केले. त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय ग्राह्य ठरविणारा निर्णय दिला. श्री. तांबोळी यांनी अपिलात उपस्थित केलेल्या अन्य मुद्दयांवर स्पष्टीकरणात्मक व त्या त्या संबंधित विभागांशी संपर्क साधण्याची सूचना करणारे असे हे उत्तर होते. हे स्पष्टीकरण अमान्य असल्याचे नमूद करुन त्याविरुध्द श्री. तांबोळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

सफाई कामगारांचे प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेले प्रश्न सुटावेत, असा त्यांचा या पत्रव्यवहारामधील उद्देश आहे. 'सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवेतील नियुक्तीबाबतच्या आपल्या संघटनेकडून वारंवार उपस्थित करण्यात येणाऱ्या समस्यांमध्ये प्रामुख्याने सफाई कर्मचाऱ्यांना वशिला पध्दतीने नेमणुका देताना त्या त्या संबंधित विभागाने घेतलेल्या वारसांच्या पात्रतेबाबतचे अथवा वयोमर्यादा किंवा अर्ज करण्याच्या विहित मुदतीबाबतच्या जाचक अटी रद्द करणे यासारख्या प्रलंबित मुद्दयांबाबत आपल्या संघटनेचा पाठपुरावा दिसतो. तरी विविध विभागांनी याप्रकरणी नमूद केलेल्या सदरहू अटी या शिथिल अथवा रद्द करावयाच्या झाल्यास त्या त्या विभागांनी त्यांच्या आस्थापनेवरील पदांसाठी शासन मान्यतेने तयार केलेल्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा कसे, याची तपासणी करुन तसा प्रस्ताव आवश्यकता भासल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या सेवा उपविभागाची त्याबाबत सहमती घेऊन त्या त्या प्रशासकीय विभागांच्या मंत्री महोदयांच्या मान्यतेने याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे.

'सामान्य प्रशासन विभागातील मागासवर्गीय कक्ष हा शासकीय सेवेतील मागासवर्गीयांचे आरक्षण, बिंदू-नामावली इत्यादींच्या अंमलबजावणीविषयक कामकाजाबरोबर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबीतील समस्यांचे निराकरण यासारख्या कामकाजासाठी नेमण्यात आला असला तरी वर नमूद केल्याप्रमाणे सफाई कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लाड व पागे समितीच्या शिफारशीनुसार करावयाच्या कार्यवाहीच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्रपणे नगरविकास, उद्योग, उर्जा व कामगार विभाग तसेच सामाजिक न्याय विभागावर जबाबदारी असल्याने, आपण नमूद केलेल्या मागण्यांचा या मागासवर्गीय कक्षाशी संबंध येत नाही,' असे श्री. दि.धों. तिवरेकर, अवर सचीव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी श्री. तांबोळी यांना दि. २४.१.२००६ रोजी पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे. सफाई कर्मचाऱ्यांची नेमणूक, त्यातील वारसांच्या पात्रतेबाबतचा निकष आणि प्रलंबित मुद्दयांबाबत अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस करीत असलेल्या पाठपुराव्याचाच एक भाग, असे श्री. तांबोळी यांच्या निवेदनाचे व अर्जाचे स्वरुप आहे. सफाई कामगारांच्या मागण्या हा श्री. तांबोळी यांच्या सर्व अर्ज व अपिलामधील मुख्य विषय आहे. मूळ अर्जापासून आयोगापुढील अपिलापर्यंत श्री. तांबोळी यांनी आपल्या निवेदनात विस्तृत भाष्य केले आहे. त्यातील भाषा, अधिकृत पत्रव्यवहारातील मर्यादा संभाळणारी नाही. (उदा. 'बुध्दिवंताचे बुध्दिवंत उत्तर काही वेगळेच, तर साधारण सफाई कर्मचारी काय झक मारणार' ).

सामान्य प्रशासन विभागाचा मागासवर्गीयांसाठीचा विभाग म्हणून या मागण्यांबद्दल आस्थेने लक्ष घालून विविध विभागांसमवेत बैठका घेणे, कार्यवाहीच्या दृष्टीने चर्चा घडवून आणणे अशा स्वरुपाच्या समन्वयाचे काम केले जाते. मूळात हे कर्मचारी नगरपरिषद, जिल्हा परिषद इत्यादी स्थानिक संस्थांच्या, पर्यायाने नगर विकास विभागाच्या कक्षेत येतात, त्याच्यांबाबत निर्णय व कार्यवाही करण्याचे अधिकार सामान्य प्रशासन विभागाला नाहीत, असे उप सचीव श्री. मि.वा.गेडाम व अवर सचीव श्री. गो.आ.लोखंडे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. मुख्य सचीवांसह विविध अधिकाऱ्यांच्या पातळीवर या प्रश्नांबाबत झालेल्या बैठकांविषयाची माहिती देणारी कागदपत्रे त्यांनी सादर केली.

सफाई कामगारांच्या मागण्या व त्या संबंधातील कार्यवाही या अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियमात येणारी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. मात्र अन्य विभागाकडून माहिती घ्यावी असे कळविण्याऐवजी संबंधित अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांनी त्या त्या विभागाकडे पाठविणे आवश्यक होते. श्री. तांबोळी यांच्या अर्जातील मागण्यांबाबतचा भाग माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेत येत नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व त्यांनी मांडलेल्या भूमिका लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. अपीलकर्त्याने नेमकी 'माहिती' मागितल्यास ती त्वरीत द्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. २३.८.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे - १

अपील क्र. १७१ / सांगली

श्री. संतोष किसन महाजन,
जावडेकर चौक, कापूसखेड नाक्याजवळ, — अपीलकर्ता
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

अपील क्र. १७२ / सांगली

श्री. बाबासाहेब गणपती पाटील
राधेय, ब्राम्ह्मणपुरी, इस्लामपूर, ता. वाळवा, — अपीलकर्ता
जि. सांगली

**विरु ध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली — उत्तरवादी
श्री. वि. ना. परदेशी

जन माहिती अधिकारी तथा
प्रमुख लिपिक,
अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय,
सांगली, जि. सांगली
श्री. पी. बी. माने

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१ + १७२ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३ /७/२००७ |

३ उपस्थित

**अपीलकर्ता** १) श्री. संतोष किसन महाजन, जावडेकर चौक, कापूसखेड नाक्याजवळ, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

२) श्री. बाबासाहेब गणपती पाटील, राधेय, ब्राम्ह्मणपुरी, इस्लामपुर, ता. वाळवा, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली श्री. वि. ना. परदेशी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक, अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, सांगली, जि. सांगली श्री. पी. बी. माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.११.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.१२.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

अपील क्र. १७१ + १७२ / सांगली

अ. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, वाळवा, इस्लामपूर यांनी श्री. किसन पांडुरंग महाजन, रा. इस्लामपूर यांचेबाबत दिलेल्या अहवालाची छायांकित प्रत

ब. मिळकत पत्रिकेवर नोंदी करताना अपार्टमेंट कायद्यानुसार नियमांची माहिती

क. मिळकतपत्रिकेचे खरेदी व्यवहाराचा दस्त होताना पहिल्या मजल्यावरील टेरेस खरेदी असे खरेदीपत्र होऊन नोंद होण्याबाबत नियमांची माहिती

ड अपार्टमेंट कायद्यानुसार नोंदी न करता झालेल्या बेकायदेशीर नोंदी करणा-या आणि मंजूर करणा-या अधिका-यांवर कार्यालयाकडून होणा-या कारवाई / नियमांची माहिती

इ. दिवाणी कोर्टाचा आदेश मानून जैसे थे परिस्थिती ठेवावी, असा अर्ज दिल्यानंतर कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी आदेशभंग करुन बेकायदेशीर नोंदी करणाऱ्याचेवर फौजदारी कारवाईच्या मागणीसाठीचा मागणी पूर्तता करण्यासाठीची माहिती

एफ . कार्यालयीन कर्मचारी अधिका-यांकडून बेजबाबदारपणे कार्यालयीन दप्तरात नोंदीबाबत झालेल्या व्यवहारास त्यांचेवर कारवाई होण्यासाठी कार्यालयीन कारवाईची परिपूर्ण पध्दत आणि इत्थंभूत माहिती, त्यामध्ये कोणाकडे अर्ज करुन तो किती दिवसामध्ये न्याय मिळेल व शिक्षेचे स्वरुप काय, याची माहिती

जी. ऑक्टोबर २००५ अखेर कार्यालयाकडे एकूण आलेल्या तक्रारग्रस्त ग्राहकांची प्रकरणांची तालुकावार संख्येची माहिती

एच. कार्यालयाकडे दाखल झालेल्या अर्जावरती अर्जदारास न्याय मिळणेबाबत किती दिवसांचा अवधी लागतो किंवा सदर प्रकरण निर्गत करुन कळवणे बंधनकारक आहे याची माहिती

आय. कार्यालयाकडे असणारे अधिकारी/कर्मचारी यांची माहिती

१. अनु. क्र. २. कर्मचा-याचे नाव ३. हुद्दा /कामाचे स्वरुप ४. सध्या मिळणारे एकूण वेतन ५. बदली आदेशाचा भंग होऊन कार्यालयात झालेली सेवा (वर्ष/महिने) ६. बदली स्थगिती असल्यास कोणामुळे त्यांचे पदनाम ७. स्वतःचे नावावर अगर कुटुंबियांच्या नावावर प्लॉट, बंगला/घर, दुचाकी, चारचाकी, जमीन खरेदी असे व्यवहार

जे. जिल्ह्यामध्ये अधिकारात असलेल्या कर्मचारी/अधिका-यांपैकी लाचलुचपत खात्याने पकडलेले शिक्षा झालेले / सुटलेले याची नावासहित माहिती

के. पाच वर्षातील कार्यालयीन कामासाठी/व्यवस्थेसाठी झालेला /केलेला सालवार खर्च

एल. केलेल्या कामाच्या खर्चाची लेखापरीक्षण अहवालामध्ये नोंदी घेतलेल्या तपशिलाची छायांकित प्रत

एम. कार्यालयाचे अधिकारात असलेले वाहन, त्याचा डिझेल/पेट्रोल खर्चाची माहिती. तसेच जून २००५ ते ऑक्टोबर २००५ मधील तालुका फिरतीचा तपशील नोंदी

## विवेचन

मुद्दा क्र. अ ते एम अशा १३ मुद्दयांची व 'आय' अंतर्गत सात पोट मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. संतोष किसन महाजन व श्री. बाबासाहेब गणपती पाटील यांनी दोन स्वतंत्र अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, सांगली यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी श्री. पी. बी. माने यांनी पुढीलप्रमाणे उत्तर पाठविले :

'महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ मधील नियम ७ (ड) व माहिती मिळविण्याच हक्क अधिनियम २००५ मधील नियम ८ (घ) नुसार अ.क्र. जी ते एम अखेरची माहिती देता येत नाही.'

याविरुध्द श्री. महाजन व श्री. पाटील यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली, श्री. वि. ना. परदेशी यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिका-यांनी जन माहिती अधिका-यांचा निर्णय ग्राह्य ठरवून अपील फेटाळले. मात्र त्याबरोबरच तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, इस्लामपूर, ता. वाळवा यांनी श्री. किसन पांडुरंग महाजन यांच्या संदर्भात सादर केलेल्या अहवालाची प्रत पाठविली, तसेच मुद्दा क्र. बी, सी, डी, ई व एफ याबाबत जन माहिती अधिका-यांची मूळ भूमिका रास्त ठरवितानाच स्पष्टीकरणात्मक अशी काही माहिती दिली. त्याविरुध्द श्री. महाजन व श्री. पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

अपिलीय प्राधिका-यांनी दि. ३१.१.२००६ रोजी निर्णय दिला. राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्यासाठी त्यानंतर ९० दिवसांची मुदत होती. परंतु दोघांनीही दि. २२.८.२००६ रोजी अपील सादर केले. विहित मुदतीत नसतानाही ते सुनावणीसाठी स्वीकारण्यात आले. दोन्हीही अपिलांची स्वतंत्रपणे सुनावणी दि. १३.७.२००७ रोजी घेण्यात आली.

प्रत्यक्षात दोन स्वतंत्र अर्ज व दोन स्वतंत्र अपिले असली तरी, केवळ अर्जदारांची नावे व पत्ते वगळता अर्ज, प्रथम अपील, द्वितीय अपील, निवेदने यासह सर्वांच्या तारखा सारख्याच आहेत, तसेच त्यातील मजकूर शब्दशः तसाच आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे उत्तर, निर्णय व निवेदने यांच्याही तारखा समान आणि मजकुर शब्दशः एकच आहे. अर्जदाराने ठरवून केलेली ही कृती असून द्वितीय अपील करण्यास लागणा-या विलंबाचे कारण तारखांसह सारखेच आहे. दोघांनीही 'आजारपण व घरगुती कारण' दिले आहे. अर्जदारांची ही कृती माहितीचा अधिकार अधिनियम वापराबाबतच्या त्यांच्या भूमिकेविषयी सांशकता निर्माण करणारी आहे, याची स्पष्ट जाणीव त्यांना सुनावणीच्या वेळी देण्यात आली आहे, ती पुन्हा नमूद करण्यात येत आहे.

मूळ अर्जात मागणी केलेले अनेक मुद्दे संदिग्ध आहेत. तसेच वरील मुद्दे क्र. अ व एफ अशा स्वरुपाचे अथवा 'आदेशभंग करुन बेकायदेशीर नोंदी' या सारख्या गृहितांवर आधारलेले, संदिग्ध व माहितीच्या व्याख्येत न बसणारी विचारणा करणारे आहेत. जन माहिती अधिका-यांच्या उत्तराचे स्वरुप पाहता माहिती न देण्यावर भर आहे. 'अधिनस्त कार्यालयाकडून वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केलेल्या पत्रव्यवहाराची प्रत देता येत नाही,' अशासारखी विधाने त्यांनी केली आहेत. तसेच मूळ अर्ज महाराष्ट्र

माहितीचा अधिकार अधिनियम २००२ / केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ यानुसार केला असल्यामुळे जन माहिती अधिका-यांनी उत्तरामध्ये मुद्दा क्र. जी ते एम बाबत माहिती नाकारताना महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ मधील नियम ७ (ड) व केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियम ८ (घ) याचा हवाला दिला आहे. महाराष्ट्र माहितीच्या अधिकाराचा कायदा निरस्त झाला आहे, तसेच त्यात नियम ७ मध्ये कलम (ड) नाही. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियम ८ (घ) ( वाणिज्य क्षेत्रातील व्यवहार, गुपिते किंवा बौध्दिक संपदा, त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल अशी माहिती ) येथे लागू होत नाही. या कलमांचा उल्लेख केला असला तरी जन माहिती अधिका-यांचे उत्तर अपिलीय प्राधिका-यांनी ग्राह्य मानले आहे व काही बाबतीत संदिग्ध समर्थन आहे. केवळ 'माहिती अधिकारी विलंबास पात्र ठरत नाहीत,' यावर एकूण भर आहे. (उदा. मुद्दा क्र. एच- क्रमाने अर्ज निकाली काढले जातात, म्हणजे काय, याचे स्पष्टीकरण नाही.) मुद्दा क्र. आय मधील मालमत्ता व दायित्व माहिती विषयी 'दर पाच वर्षांनी वरिष्ठांकडे अहवाल सादर केला जात असतो' या सारखे काही स्पष्टीकरण आदेशात समाविष्ट केले आहे. 'केंद्रिय माहितीचा कायदा नुकताच अस्तित्वात आला होता, त्यामुळे त्याचे पुरेसे ज्ञान नव्हते, म्हणून या चुका झाल्या,' असे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिले. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्यानंतरच्या दीड-दोन महिन्यातील हा अर्ज असल्यामुळे हे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे. अर्जदारांना हवी असलेली माहिती नाकारण्याचा आपला उद्देश नाही, अर्जदारांनी नेमक्या माहितीची मागणी केल्यास ती त्वरित दिली जाईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्ट केले. अर्जदारांनी नेमक्या माहितीबाबतचे निवेदन देण्याचे मान्य केले. त्यानुसार दि. १७.७.२००७ पर्यंत अर्जदारांनी जन माहिती अधिका-यांना निवेदन द्यावे व त्यानंतर सात दिवसात पुढीलप्रमाणे माहिती दिली जाईल असे त्यानी कबूल केले.

१. मुद्दा क्र. अ - प्रत द्यावी.

२. मुद्दा क्र. सी व डी संबंधी पुस्तक अपीलकर्त्याने घ्यावे.

३. मुद्दा क्र. डी, ई, एफ या बाबत जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर रास्त आहे.

४.	मुद्दा क्र. जी ते एम मधील मुद्दा आय मधील पोट मुद्दा ७ वगळता इतर माहिती देण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

अर्जदारांनी द्यावयाच्या निवेदनात मूळ अर्जाव्यतिरिक्तची माहिती मागता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

वरील बाबी घ्यानात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१.	अपील अंशत: मान्य.

२.	विवेचनात नमूद केल्याप्रमाणे माहिती अर्जदारांना देऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा. हा आदेश मिळाल्यापासून सात दिवसात पूर्तता अहवाल पाठवावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. ९.८.२००७

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.अमोल अशोक कोले,
मु.पो.उपळाई (खुर्द), ता.माढा,
जि. सोलापूर अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हा कृषि अधिकारी, उत्तरवादी
सोलापूर, जि. सोलापूर

जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
माढा, जि. सोलापूर
श्री. वि.ना. भुजबळ

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.८.२००७ |
| ३ | **अपीलकर्ता** श्री. श्री.अमोल अशोक कोले, मु.पो.उपळाई (खुर्द), ता.माढा, जि. सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी, माढा, जि. सोलापूर श्री. वि.ना. भुजबळ | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.१२.२००५ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.३.२००६ |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे उपळाई ( खुर्द ) येथे रोजगार हमी योजनेअंतर्गत कृषि कार्यालयामार्फत झालेल्या नाला सरळीकरण क्रमांक २/१ व मस्टर क्रमांक १०७२१७ ते १०७२२० च्या छायांकित प्रती

## विवेचन

मौजे उपळाई (खुर्द), ता. माढा, जि. सोलापूर येथे दि. १.६.२००५ ते दि. २०.६.२००५ या कालावधीत कृषि कार्यालयामार्फत रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या नाला सरळीकरण गट क्रमांक २/१ च्या मस्टर क्रमांक १०७२१७ ते १०७२२० यांच्या छायांकित प्रतींची मागणी अपीलकर्ता श्री. अमोल अशोक कोले यांनी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माढा, जि. सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना ६४ रुपये शुल्क भरण्यास कळविले. हे शुल्क भरल्यानंतरही आपल्याला वरील माहिती मिळाली नाही, म्हणून श्री. कोले यांनी उपविभागीय कृषि अधिकारी, कुर्डूवाडी यांच्याकडे अपील दाखल केले. (ते अपिलीय प्राधिकारी नसल्यामुळे) त्यांनी दखल न घेतल्यामुळे जिल्हा कृषि अधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील दाखल केले. संबंधित मस्टरच्या छायांकित प्रती आपण व्यक्तिशः नेणार असल्याचे श्री. कोले यांनी अर्जात नमूद केले होते. त्यानुसार घेऊन जाण्याबाबत त्यांना पत्राव्दारे कळविले होते. त्यांनी त्या व्यक्तिशः नेल्या नाहीत, असे कारण नमूद करुन अपिलीय प्राधिका-यांनी त्यांचे अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री. कोले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. कोले यांना संबंधित माहिती नाकारण्याचा अधिकाऱ्यांचा कोणताही उद्देश नव्हता. अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्यांनी आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर माहिती समक्ष घेऊन जाणे आवश्यक होते, म्हणून ती टपालाने पाठविली नाही. माहिती तयार असून ती त्यांना कधीही देता येईल, असे जन

माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माढा श्री. वि. ना. भुजबळ यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. यापूर्वी ही माहिती त्यांना समक्ष देण्यात आली आहे, असे त्यांनी नमूद केले. परंतु माहिती समक्ष घेऊन जाण्याची सूचना देणारे पत्र दि. १०.१.२००६ रोजी कृषि अधिकारी श्री. पी. एस. कदम यांच्या समक्ष आपल्याला देऊन पोच घेतल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सर्जेराव तळेकर यांनी म्हटले आहे, ते सत्य नाही. त्या पत्रावर आपली बनावट सही केली गेली आहे. ती सही आपली नसल्याचे आपण जिल्हा कृषि अधिकारी यांना अपिलाच्या सुनावणीच्या वेळी सांगितले होते, परंतु त्यांनी ते मान्य केले नाही. या सहीची शहानिशा होणे आवश्यक होते. ते न झाल्यामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे व माहिती नाकारली गेली आहे, असे प्रतिपादन श्री. कोले यांनी केले. अपिलीय प्राधिका-यांपुढील सुनावणीच्या वेळीही त्यांनी असे निवेदन केले होते.

माहिती समक्ष येऊन घेऊन जाण्याबाबत आपल्याला कोणतीही सूचना मिळाली नाही, असे श्री. कोले यांचे म्हणणे आहे, तर त्यांना तीन वेळा त्याबाबत कळविले गेले. एवढेच नव्हे, तर कृषि पर्यवेक्षक श्री. एस. बी. मठपती यांना संबंधित छायांकित प्रती देण्यासाठी श्री. कोले यांच्याकडे पाठविण्यात आले होते. परंतु भेट न झाल्यामुळे तेव्हा माहिती देता आली नाही, असे तालुका कृषि अधिकारी श्री. भुजबळ यांनी देखील लेखी व तोंडी निवेदनात नमूद केले. नंतर ही माहिती श्री. कोले यांना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र श्री.कोले यांनी त्याचा इन्कार केला. दि. १०.१.२००६ च्या पत्रावर पोच दिल्याची श्री. कोल्हे यांची सही खरी, की बनावट, हा यातील मतभेदाचा मुद्दा आहे. तालुका कृषि अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्याला हव्या असलेल्या छायांकित प्रती सोबत आणल्या होत्या. आयोगापुढील सुनावणीच्या वेळी त्यांनी त्या श्री. कोले यांना दिल्या.

जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले शुल्क श्री. कोले यांनी भरले होते. समक्ष माहिती स्वीकारण्यास आपण वारंवार गेलो, स्मरणपत्रे दिली, परंतु माहिती मिळाली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. तर माहिती घेण्यासाठी सूचना देऊनही ते आले नाहीत, असे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी तशा आशयाच्या पत्रांच्या प्रती व संबंधित अधिकाऱ्यांचे लेखी खुलासे सादर केले. एकूण निवेदने व कागदपत्रे पाहता माहिती नाकारण्याची अधिकाऱ्यांची भूमिका दिसत नाही. मात्र दि. १०.१.२००६ च्या पत्रावरील पोच देणारी सही श्री. कोले यांचीच आहे, असे

चौकशी करण्याचा विषय आहे. अशी शहानिशा होऊन सत्य पुढे येणे आवश्यक आहे. माहिती देण्याबाबतच्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर व माहिती मागण्याच्या अर्जदाराच्या भूमिकेवर त्यातून प्रकाश पडू शकेल. माहितीचा अधिकार कायद्याच्या दृष्टीने ते होणे महत्वाचे आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. दि. १०.१.२००६ च्या पत्रावर पोच देण्यासाठी केलेल्या स्वाक्षरीबाबत जिल्हा कृषि अधिकारी श्री. दिलीप झेंडे यांनी शहानिशा करुन दि. ३०.८.२००७ पर्यंत संबंधितांच्या लेखी खुलाशासह आयोगाला अहवाल सादर करावा. आवश्यक त्या पुढील कार्यवाहीबाबत त्यानंतर आदेश निर्गमित करण्यात येतील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दिनांक :- १४/८/२००७**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. शाळीग्राम गोविंद बकरे,
५८७, बुधवार पेठ, पाटील निवास, — अपीलकर्ता
जिजामाता बाग, पुणे-४११ ००२

**विरु ध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) व
मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर — उत्तरवादी
श्री. शरद जाधव

जन माहिती अधिकारी तथा
सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२, पुणे
श्री. अे. आर. आढारी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.६.२००७ |

**उपस्थित**
**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) व
मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर श्री. शरद जाधव

तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी
श्री. अे.आर. आढारी

४ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

मौजे पर्वती, ता. हवेली, पुणे-९ येथील खरेदी दस्त क्र. ७७१९/८२ ची नक्कल

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शाळीग्राम गोविंद बकरे यांनी जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, पुणे यांच्याकडे अर्जाद्वारे दस्त क्र. ७७१९/८२ ची प्रत मागितली होती. दि. १.१२.२००५ रोजी केलेल्या या अर्जावर जन माहिती अधिका-यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. त्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांच्याकडे दि. १९.१.२००६ रोजी अपील दाखल केले. त्यानंतरही संबंधित दस्तऐवजाची प्रत मिळाली नाही, म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. श्री. बकरे यांनी मागणी केलेला दस्तऐवज मौजे पर्वती येथील दि. १४.१२.१९८२ चा खरेदी दस्तऐवज आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जाची दखल घेतली नाही, परंतु आपण दि. १७.२.२००६ रोजी दुय्यम निबंधक हवेली क्र.२, पुणे शहर यांना पत्र पाठवून 'संबंधिताना तात्काळ मूळ दस्तऐवज नियमानुसार परत करण्यात येवून उलट टपाली अहवाल सादर करावा', असे कळविले होते, तसेच दि. २३.२.२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु श्री. बकरे उपस्थित राहिले नाहीत व त्यांनी नंतर संपर्क साधला नाही, त्यामुळे प्रकरण प्रलंबित ठेवून अंतिम आदेश काढण्यात आला नव्हता, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर श्री. ए.आर. आढारी यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी निवेदन केले. जन माहिती अधिकारी म्हणून या कालावधीत कनिष्ठ लिपिक श्री. बी.एस. देशमुख हे काम पाहत होते, असेही त्यां निवेदनात नमूद केले आहे. संबंधित देस्तऐवज शोध घेऊनही सापडत नसल्याचे विद्यमान सह जिल्हा निबंधक (वर्ग-१), पुणे शहर श्री. शरद जाधव यांनी म्हटले आहे. तसेच संबंधित दस्तऐवज अभिलेख कक्षामध्ये आढळ होत नसल्याचे तत्कालीन सह दुय्यम निबंधक श्री. अे. बी. कांबळे यांनी दि. ७.२.२००६ रोजी श्री. बकरे यांना कळविल्याचे तत्कालीन वरिष्ठ लिपिक श्री. अे.बी. भोसले यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे आपण सुनावणीला समक्ष हजर राहू शकत नाही, मात्र वारंवार मागणी करुनही आपल्याला दस्ताची सत्य प्रत अथवा मूळ प्रत मिळत नाही, असे श्री. बकरे यांनी आयोगाला दि. १०.६.२००७ रोजी पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. मात्र दि. १२.६.२००७ रोजी पाठविलेल्या पत्रात त्यांनी सदर अपील आपल्याला चालवावयाचे

नसून ते निकाली काढावे, आपली कोणतीही तक्रार नाही, असे नमूद केले आहे. अपीलकर्त्याने केलेल्या या विधानाचा उल्लेख विद्यमान सह जिल्हा निबंधक (वर्ग-१), पुणे शहर श्री. शरद जाधव यांच्या निवेदनात केला आहे. परंतु आधीचा पत्रव्यवहार व एकूण कागदपत्रे पाहता श्री. बकरे यांनी हा उल्लेख उद्वेगाने केला असावा, असे दिसते.

आपल्या कार्यालयाकडील कागदपत्रांचे प्रमाण मोठे आहे, कार्यालयाच्या बदलत्या जागेचाही कागदपत्रांच्या व्यवस्थेत प्रश्न येतो, तरीही कागदपत्रांचा शोध घेणे चालू आहे, असे श्री. जाधव यांनी नमूद केले.

अपीलकर्त्याला अपेक्षित असलेली कागदपत्रे देणे नियमानुसार सह जिल्हा निबंधक, मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर यांच्या कार्यालयावर बंधनकारक आहे. 'कागदपत्रांचा आढळ होत नाही' हे कारण मान्य करण्यासारखे नाही, त्यामुळे दि. १३.७.२००७ पर्यंत अपीलकर्त्याला आवश्यक ती कागदपत्रे द्यावीत अन्यथा संबंधित काळात या कागदपत्रांची जबाबदारी असणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर फौजदारी गुन्हा नोंदवावा असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला.

वरील संदर्भाच्या अनुषंगाने आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. कागदपत्रांविषयी दि. १३.६.२००७ रोजी दिलेल्या आदेशाच्या कार्यवाहीबाबतचा पूर्तता अहवाल सह जिल्हा निबंधक (वर्ग १), पुणे शहर श्री. शरद जाधव यांनी दि. १०.९.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. २३.८.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे १

श्री. भिमसेन धर्मराज चव्हाण,
संपादक 'झेप' यांचे कार्यालय,
अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर,
इंदापूर, जि. पुणे

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी,
पुणे, जि. पुणे
श्री. एस.बी. दोरगे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उप विभागीय कृषि अधिकारी, बारामती
श्री. सुनिल बोरकर

उप विभागीय कृषि अधिकारी, खेड,
श्री. संपत थोपटे

उप विभागीय कृषि अधिकारी, पुणे
श्री. गोविंद परजणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २ / पुणे |

| | | |
|---|---|---|
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. भिमसेन धर्मराज चव्हाण, संपादक 'झेप' यांचे कार्यालय, अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर, इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, पुणे, जि. पुणे श्री. एस.बी. दोरगे

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय कृषि अधिकारी, बारामती,जि.पुणे श्री. सुनिल बोरकर,

उप विभागीय कृषि अधिकारी, पुणे (हवेली),जि.पुो श्री. गोविंद परजणे

उप विभागीय कृषि अधिकारी, खेड, जि.पुणे श्री. संपत थोपटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.८.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.१०.२००५ बारामती<br>दि. १२.११.२००५ पुणे<br>दि. १६.११.२००५ खेड |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :

रोजगार हमी योजनेच्या कामांत इ. सन २००२ ते २००४ या कालावधीत विविध मार्गाने गैरव्यवहार करुन बेहिशोबी मालमत्ता गोळा केलेल्या तालुका कृषि अधिकारी, भोर, शिरुर, आंबेगाव व सासवड यांच्यावर कारवाई केलेल्या अहवालाच्या प्रती

# विवेचन

श्री. बाळासाहेब मगर (भोर), श्री. कुंडलिकराव कारखिले (शिरुर), श्री. चंद्रकांत भोर (आंबेगाव), श्री. मदन मुकणे (सासवड) या तालुका कृषि अधिकाऱ्यांनी रोजगार हमी योजना कामात विविध मार्गांनी गैरव्यवहार करुन बेहिशोबी मालमत्ता गोळा केल्याचा आरोप करुन त्यांच्या चौकशीची मागणी श्री. भिमसेन धर्मराज चव्हाण यांनी दि. १.२.२००५ व दि. १४.२.२००५ रोजी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, कृषि विभाग, पुणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व कार्यवाही केली नसल्यास दिरंगाईची कारणे अशी सन २००२ ते २००४ या काळातील माहिती त्यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ अन्वये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी पुणे (हवेली), खेड, भोर यांच्याकडे दि. १२.८.२००५ व ३०.८.२००५ रोजी मागितली होती.

जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, कृषि विभाग, पुणे यांनी बारामती, खेड (राजगुरुनगर), पुणे (हवेली), विभागाच्या उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. या अहवालाची प्रत अर्जदाराला पाठविण्याचे त्यांनी त्यात नमूद केले. दि. २०.१०.२००५ व दि. ४.३.२००६ रोजी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांनी हे आदेश दिले. संबंधित उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती श्री. चव्हाण यांना त्यानंतर पाठविली. 'रोजगार हमी योजना दक्षता पथक, कृषि आयुक्तालय, पुणे, तसेच विभागीय कार्यालयातील अधीक्षक अभियंता यांच्याद्वारे रोजगार हमी योजनेमधील कामांची तपासणी झाली आहे, अनुदान वाटपात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही,' असे त्यात नमूद करण्यात आले होते. परंतु माहिती विहित मुदतीत मिळाली नसल्याचे व ती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याचे नमूद करुन श्री. चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे यांच्याकडे अपील केले. माहिती मागणीच्या मूळ अर्जात नसलेले श्री. नंदकुमार शिंदे (इंदापूर) या तालुका कृषि अधिकाऱ्याचे नावही

श्री. चव्हाण यांनी या अपिलात समाविष्ट केले. असे करणे नियमबाह्य आहे. परंतु इंदापूरच्या उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांकडूनही जिल्हा अधीक्षक कृषि अधिकाऱ्यांनी अहवाल मागविला. या अहवालाची प्रत श्री. चव्हाण यांना देण्यात आली. परंतु आपल्याला माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन त्यांनी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांच्यापुढील सुनावणीत श्री. चव्हाण उपस्थित राहिले नाहीत, असे प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. एस.बी. दोरगे यांनी राज्य माहिती आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. संबंधित विभागातील कामांमध्ये गैरव्यवहार करुन अधिकाऱ्यांनी बेहिशोबी मालमत्ता गोळा केल्याचा श्री. चव्हाण यांचा आरोप आहे. श्री. चव्हाण 'झेप' या साप्ताहिकाचे संपादक असून सदर विभागातील आर्थिक गैरव्यवहार साप्ताहिक 'झेप'मध्ये प्रकाशित करण्याकामी/जनजागृतीसाठी/ याचिका दाखल करण्यासाठी जनहितार्थ वरील माहिती आवश्यक आहे, असे त्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या जोडपत्रात म्हटले आहे. असा कोणताही गैरव्यवहार झाला नसल्याचे संबंधित उपविभागीय कृषि अधिकाऱ्यांनी लेखी नमूद केले आहे. आपला आरोप खरा असल्याचे गृहीत धरुन त्याची माहिती संबंधित खात्याकडून मिळावी, असा श्री. शिंदे यांचा पवित्रा आहे. बेहिशोबी मालमत्तेबाबतची चौकशी ही आपल्या कार्यालयाच्या कक्षेतील बाब नाही, असे संबंधित अधिकाऱ्यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. अशा प्रकारचे आरोप करुन श्री. चव्हाण वारंवार विविध प्रकारची माहिती त्रास देण्याच्या हेतूने मागत असतात, असे या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. श्री. चव्हाण यांना ते मान्य नाही. तत्कालीन उपविभागीय कृषि अधिकारी, पुणे श्री. नाथा राणे यांच्याकडून लाच स्वीकारताना श्री. भिमसेन धर्मराज चव्हाण यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने पकडले होते, त्याबाबतचा दावा न्यायालयात दाखल आहे, अशी माहितीही यावेळी देण्यात आली. आपल्याविरुध्द असा दावा दाखल असल्याचे श्री. चव्हाण यांनी मान्य केले, मात्र तो खोटा असल्याचा दावा त्यांनी केला.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता माहिती देण्यास विलंब झाला आहे, हे स्पष्ट आहे. त्याबद्दल संबंधितांना शास्ती लावावी, अशी मागणी श्री. चव्हाण यांनी केली. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी श्री. चव्हाण यांच्या पत्रांना त्या त्या वेळी उत्तरे दिली आहेत, तसेच जन माहिती

अधिकाऱ्यांनी माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे, हे स्पष्ट होते. माहिती देण्याबाबतची जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही लक्षात घेता विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. ३०.८.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. नंदकुमार पाटीलबुवा गारगोटे,
मु.पो.कडूस, ता. खेड, जि. पुणे-४१२४०४ — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) — उत्तरवादी
जिल्हा परिषद, पुणे
श्री. प्रकाश मेघ:श्याम परब

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
भैरवनाथ विद्यालय, दोंदे,
ता. खेड, जि. पुणे
श्री. विठ्ठल मारुती भोर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१, २३ व ३२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.६.२००७ |

| | | |
|---|---|---|
| **३. उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे<br>श्री. प्रकाश मेघ:श्याम परब<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, भैरवनाथ विद्यालय, दोंदे,<br>ता. खेड, जि. पुणे श्री. विठ्ठल मारुती भोर | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.८.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**<br><br>सन १९९३-९४, १९९४-९५ व १९९८-९९ या शैक्षणिक वर्षातील माहे ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर या महिन्यांची शिक्षक हजेरी पत्रक, देयक पत्रके याच्या प्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नंदकुमार पाटीलबुवा गारगोटे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, भैरवनाथ विद्यालय, दोंदे, ता. खेड, जि. पुणे यांच्याकडे विद्यालयातील कर्मचाऱ्यांची वैयक्तिक व सांधिक अशी इ.सन १९९३-९४, १९९४-९५ व १९९८-९९ या शैक्षणिक वर्षामधील हजेरीपत्रक, वेतनाचे देयकपत्रक आदि माहिती मागितली होती. दि. १२.१२.२००५, दि. १८.१२.२००५ व दि. ७.१.२००६ अशा तीन अर्जांद्वारे त्यांनी ही मागिती मागितली होती. हे अर्ज कायद्याप्रमाणे विहित नमुन्यात नसल्याचे उत्तर जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १३.१.२००६ रोजी एकत्रितपणे अपीलकर्त्याला पाठविले. त्याविरुध्द श्री. गारगोटे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा

परिषद, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांनी तीनही अपिलांचा एकत्रित निर्णय देऊन उपलब्ध माहिती श्री. गारगोटे यांना नि:शुल्क देण्याचा आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिला. तरीही माहिती मिळाली नाही म्हणून, तसेच तीन वेगवेगळे अर्ज केले असताना जन माहिती अधिकाऱ्यांनी एकत्रित उत्तर व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी एकत्रित निर्णय दिला, या कारणावरुन श्री. गारगोटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले दाखल केली आहेत.

तीनही अपिलांमध्ये विषय एकच आहे, त्यामुळे त्याचा एकत्रित विचार करुन राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ. सुरेश वि. जोशी यांनी दि.१४.२.२००७ रोजी तीनही अपिले निकाली काढण्याचे आदेश दिले होते. परंतु त्याचा उल्लेख न करता श्री. गारगोटे यांनी नव्याने राज्य माहिती आयोगाकडे अपिले दाखल केली.

माहिती घेऊन जाण्यासंबंधी श्री. गारगोटे यांना वारंवार कळवूनही ते माहिती नेण्यास आले नाहीत, त्यामुळे त्यांना माहिती मिळाली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. विठ्ठल मारुती भोर यांनी सांगितले. तसेच याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्या त्या वेळी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे श्री. प्रकाश परब, यांना तसेच शाळा समितीला सादर केल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. श्री. गारगोटे हे भैरवनाथ विद्यालयाचे पूर्वी मुख्याध्यापक होते, त्यांना पदानवत केलेले असल्यामुळे विविध प्रकारे अर्ज करुन ते संस्थेला त्रास देत असतात, असे जन माहिती अधिकारी श्री. भोर यांनी राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ. सुरेश वि. जोशी यांच्यापुढील सुनावणीच्या वेळी सांगितले होते, त्याचाच पुनरुच्चार त्यांनी या वेळच्या सुनावणीतही केला. संबंधित अपिलांचा निर्णय राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई यांनी यापूर्वीच दिला असून तीनही अपिले निकाली काढली आहेत. त्या अपिलांचा फेरविचार करावा अशी कोणतीही नवी माहिती पुढे आलेली नाही त्यामुळे तीनही अपिले फेटाळण्यात येत आहेत.

या अपिलांची सुनावणी राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश वि. जोशी यांच्यापुढे झाल्याचे अपीलकर्त्याने कोठेही नमूद न करता त्याच अर्जासंबंधी तीन अपिले नव्याने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केली. त्याबाबत पूर्वीच निर्णय झाला असल्याचे उत्तरवादींच्या वतीने निदर्शनास आणण्यात आले. राज्य मुख्य माहिती आयुक्तांपुढील सुनावणीच्या वेळीच श्री. गारगोटे यांनी मागितलेली माहिती स्वीकारली असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी श्री. भोर यांनी त्याची पोच असलेल्या

कागदपत्राच्या प्रती सादर केल्या. निर्णय झालेल्या अर्जावरील अपिले त्या संबंधीचा कोणताही उल्लेख न करता आयोगाकडे पुन्हा सादर करण्याच्या अपिलकर्त्याच्या कृतीबद्दल आयोग तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. माहितीच्या अधिकाराचा अशा प्रकारे दुरुपयोग न करण्याची समज अपीलकर्त्याला देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. २३.८.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नेताजी नरोबा ओमासे
मु.पो.बेडग, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३३ /सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.४.२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>स्वामी समर्थ शिक्षण संस्था, बेडग यांना शासनाकडून मिळालेले अनुदान, सदर संस्थेत राहणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल माहिती, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांची निवड कोणत्या पध्दतीने झाली आहे व संस्थेमध्ये असणाऱ्या शिक्षकांची नांवे, कोणत्या पेपरला जाहिरात दिली. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता श्री.नेताजी नरोबा ओमासे यांनी स्वामी समर्थ शिक्षण संस्था, बेडग या शिक्षण संस्थेच्या आश्रम शाळांबाबतची माहिती विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली यांच्याकडे मागितली होती. माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी तो अर्ज जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, समर्थ आश्रमशाळा, बेडग यांच्याकडे वर्ग केला. मुख्याध्यापकांनी कळविलेले शुल्क श्री.ओमासे यांनी भरले नाही. श्री.ओमासे यांनी केलेल्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांनी कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा विशेष समाजकल्याण अधिकारी, सांगली व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांनी लेखी निवेदनाद्वारे व दि.१४.५.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. श्री.ओमासे सदर कार्यक्रमाला गैरहजर होते. मात्र आपण शुल्क भरुनही आपल्याला कागदपत्रे मिळालेली नाहीत असे त्यांनी अपिलात म्हटले आहे. एका अर्जाबाबत कळविलेले शुल्क रु.१५००/- श्री.ओमासे यांनी मुख्याध्यापकांकडे जमा केले, त्यानुसार माहिती घेऊन जावी असे कळवूनही ते माहिती घेउन गेलेले नाहीत, असे विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. श्री.ओमासे वेळोवेळी आपल्या कार्यालयात व वरील आश्रमशाळेकडे माहिती मागत असतात. कळविलेले शुल्क भरत नाहीत व माहिती तयार झाल्यावर घेण्यासही जात नाहीत. तसेच वारंवार तक्रार करीत राहतात, असे विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली यांनी श्री.ओमासे यांच्या अर्जाच्या तपशिलासह नमूद

केले. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही. माहिती आवश्यक असल्यास नियमानुसार शुल्क आदिबाबतची पूर्तता करुन अपीलकर्त्याने घ्यावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. जावेद सर्फराज शेख
काशाना ए हक, सॅलसबरी पार्क, अपीलकर्ता
मार्केट यार्ड, पं. नेहरू रस्ता,
पुणे - ४११ ०३७

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
उप संचालक, नगररचना, उत्तरवादी
पुणे विभाग, पुणे
श्रीमती साधना प्र. नाईक

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक, नगररचना, पुणे
श्री. ह. ज. नाझीरकर

विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे
श्री. शांताराम खंडेराव थोरात

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.६.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. जावेद सर्फराज शेख, काशाना ए हक, सॅलसबरी पार्क, मार्केट यार्ड, पं. नेहरू रस्ता, पुणे - ४११ ०३७

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप संचालक, नगररचना, पुणे विभाग, पुणे
श्रीमती साधना प्र. नाईक

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना, पुणे
श्री. ह. ज. नाझीरकर

विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे,
श्री. शांताराम खंडेराव थोरात.

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१.२००६ व<br>दि. ३०.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.२.२००६ व<br>दि. १६.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.३.२००६ व<br>दि. १३.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.४.२००६ व<br>दि. ३१.३.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मुंजेरी (गुलटेकडी) स.क्र. ५५७ अ-१, अ-२ म्हणजे न.भू.क. ९७-अ गुलटेकडी म्हणजेच नगर रचना योजना पुणे ३ येथील अंतिम भुखंड नं. ४७३/१६ व ९ मध्ये महानगरपालिकने केलेला २० फुटी रुंद पूर्व - पश्चिम रस्त्याबाबत.

विकास योजना आरखडा १९८७ मध्ये अथवा नगर रचना योजना पुणे ३ मध्ये अथवा मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये आखण्यात आलेला आहे काय, त्याचा तपशील. सदर रस्त्यासाठी क्षेत्र महानगरपालिकेने रितसर मिळकतधारकांकडून ताब्यात घेतले आहे काय. अंतिम भूखंड क. ९ व १६ या मिळकतींचा नगर रचना योजनेनुसार नकाशा व बी फॉर्म. रस्ता संपादन न करता, परंतु पुणे महानगरपालिकेने डांबरीकरण केलेले असल्यास व पुणे महानगरपालिकेला त्या जागेची आवश्यकता असल्यास मूळ मालकाला नुकसानभरपाई किंवा टी. डी. आर. मिळणेबाबत कागदपत्रांची यादी

## विवेचन

स.क्र.५५७ मुंजेरी (गुलटेकडी) म्हणजेच अंतिम भूखंड क्र. ४७३-अ, ४७३-ब व ४७३-क नगर रचना योजना पुणे ३ यामधील अंतर्गत रस्त्याबाबतची, स.क्र. ५५७-अ म्हणजेच नगर भूमापन क्र.९७, अंतिम भूखंड क्र. ४७३/ १६ व ९ मधील पूर्व - पश्चिम २० फुटी रस्ता या सदंर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. जावेद सर्फराज शेख यांनी विकास अभियंता तथा शासकीय माहिती अधिकारी, पुणे महानगरपालिका यांच्याकडे दि. ३०.१२.२००५ रोजी व जन माहिती अधिकारी, सहाय्यक संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे दि. ३१.१.२००६ रोजी मागितली होती. हा रस्ता विकास योजना आराखडा १९८७ मध्ये किंवा नगर रचना योजना पुणे ३ मध्ये अथवा मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये आखण्यात आला आहे का, या रस्त्याचा ताबा पुणे महानगरपालिकेने संबंधित मालकाकडून घेतला आहे का व त्यांना मोबदला दिला आहे का, अंतर्गत रस्त्यांचा लेआऊट कोणी केला व त्याला कोणी मान्यता दिली, या रस्त्यांबाबतची नुकसान भरपाई नगर रचनेमध्ये मंजूर केली आहे का, याबाबतचा तपशील श्री. शेख यांनी विचारला होता. दोनही अर्जांबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून मिळालेल्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे श्री. शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. अपीलकर्ता, दोनही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यासह एकत्रित सुनावणी मुक्रर करण्यात आली. अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांनी मुख्यमंत्र्यांकडील बैठकीसाठी जावे लागल्यामुळे उपस्थित राहता येत नसल्याचे कळविले होते.

अंतिम भूखंड क्र. ४७३/१६ व ९ मधील पूर्व - पश्चिम २० फुटी रस्ता मंजूर विकास आराखडा १९८७ मध्ये अथवा टि.पी. स्कीम ३ मधील रस्ता किंवा मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये आखण्यात आलेला नाही, असे दि. १६.२.२००६ रोजी महानगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. दरम्यान दि. १३.२.२००६ रोजी श्री. शेख यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांच्याकडे अपील केले होते. जन माहिती अधिकाऱ्यांनी नुकसान भरपाईबाबत भूमी व जिंदगी विभाग व टी.डी.आर. सेल यांचेशी संपर्क साधण्यास श्री. शेख यांना कळविले होते, तर अपिलीय प्राधिका-यांनी त्यांच्या आदेशात संचालक नगररचना, पुणे यांच्याकडून माहिती घ्यावी, असा निर्णय दिला. श्री. शेख यांनी दि.

३१.१.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, पुणे यांच्याकडे अर्ज केला. त्यांनी, तसेच अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक, नगर रचना, पुणे विभाग यांनी कळविले, 'अंतिम भूखंड क्र. ४७३, ४७३-अ, ४७३-ब, ४७३-क मधील अंतर्गत रस्ते अथवा लेआऊट बाबतची माहिती पुणे महानगरपालिकेने देणे आवश्यक असल्याने अर्जदाराने पुणे महानगरपालिकेकडे संपर्क करणे आवश्यक आहे. नगर रचना योजना अंतिमतः मंजूर झाल्यावर या योजनेची अंमल बजावणी करण्याचा अधिकार पुणे महानगरपालिकेकडे असल्याने अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणी पुणे महानगरपालिकेशी संपर्क साधणे अपेक्षित आहे,' पुणे महानगरपालिका व नगर रचना विभाग यांनी टोलवाटोलवीची भूमिका घेतली म्हणजे अर्जदाराला माहिती कोणीच दिली नाही.

'आमच्या मिळकतीमध्ये वर नमूद केलेला २० फूट रुंद रस्ता नियमानुसार आखण्यात याव त्याचा ताबा पुणे महानगरपालिकेने मिळकतधारकांकडून रितसर घेऊन त्याबद्दल आवश्यक तो मोबदला (आर्थिक किंवा टी.डी.आर. स्वरुपात ) देण्याचे आदेश पुणे महानगरपालिकेस देण्यात यावे,' असे श्री. शेख यांनी राज्य माहिती आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. नगर रचना विभाग अथवा महानगरपालिका या दोनही संस्थांकडे संबंधित माहिती उपलब्ध असतानाही आपल्याला ती दिली जात नसल्याचे श्री. शेख यांचे म्हणणे आहे. रस्ते होऊनही आपल्याला नुकसान भरपाई मिळालेली नाही. तसेच संबंधित रस्ता महापालिकेने ताब्यात घेतला नसेल तर जमीनही आपल्या ताब्यात मिळालेली नाही. त्यामुळे आपले लाखो रुपयांचे नुकसान होत आहे, असे श्री. शेख यांनी आयोगाकडे दि. १६.५.२००६ रोजी केलेल्या अपिलात म्हटले आहे, तर 'नगर रचना विभाग/ महानगरपालिका यांनी माहिती देण्याबाबत टोलवाटोलवी केल्यामुळे आपले कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे,' असे दि. १३.७.२००७ रोजी सुनावणी दरम्यान आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

वस्तुतः महानगरपालिकेच्या तसेच नगर रचना विभागाच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी ही माहिती आपल्या कक्षेत येत नसल्याचे म्हणणे असल्यास कोणाशी संपर्क साधावा हे अर्जदाराला कळविण्याऐवजी संबंधित विभागाकडे अर्ज पाठविणे आवश्यक होते. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये तसे स्पष्ट नमूद असून त्यासाठी पाच दिवसांचा अतिरिक्त अवधी देण्यात

आला आहे. मात्र संदर्भित विषयाबाबत माहिती देण्याची मुख्य जबाबदारी महानगरपालिकेच्या जन माहिती अधिकाऱ्यांचीच असणे अपेक्षित आहे.

या बाबतचा वाद गेली काही वर्षे प्रलंबित असल्याचे आयोगापुढील सुनावणीत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी मान्य केले. संबंधित रस्त्याबाबतची वस्तुस्थिती व उपलब्ध नकाशामधील रस्त्यांचा समावेश या संदर्भात अपीलकर्त्याचे पूर्ण शंका निरसन होईल अशी माहिती दिली गेलेली नाही, हेही उभय बाजूंच्या निवेदनांमधून स्पष्ट झाले.

१. अंतिम भुखंड क्र. ४७३ बाबत 'बी' फार्मच्या छायाप्रती

२. अंतिम भुखंड क्र. ४७३ बाबत नगर रचना योजनेचा भाग नकाशा

३. लवाद, नगर रचना योजना यांचेकडील दि. १२.३.१९७४ चा अं.भू.क्र. ४७३ बाबत निर्णयाची छायाप्रत

अशी कागदपत्रे अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे श्रीमती साधना नाईक यांनी श्री. शेख यांना सुनावणीच्या वेळी सुपूर्त केली. उर्वरित माहिती तीन दिवसात आत देण्याचे पुणे महानगरपालिकेचे जन माहिती अधिकारी श्री. शांताराम खंडेराव थोरात यांनी मान्य केले.

वरील संदर्भ, उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.

२. अपीलकर्त्याला आवश्यक असलेला नकाशा व स्पष्टीकरणात्मक माहिती दिल्याबाबतचा पूर्तता अहवाल दि. ३०.८.२००७ पर्यंत अयोगाला सादर करावा. नगर अभियंता, पुणे महानगरपालिका श्री. प्रशांत वाघमारे व उप संचालक, नगर रचना, पुणे विभाग श्रीमती साधना नाईक या अपिलीय प्राधिका-यांची ही जबाबदारी राहील.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १६.८.२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. मुल्ला महिबुब अप्पाभाई,
मुल्ला फर्निचर दुकान, शासकीय मैदानाजवळ,
नेहरु नगर, विजापूर रोड, सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
उप संचालक,
विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
श्री. गंगाधर कुं. म्हमाणे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सहायक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
श्री. वसंत मार्तंड गायकवाड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/८/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. मुल्ला महिबुब अप्पाभाई, मुल्ला फर्निचर दुकान, शासकीय मैदानाजवळ, नेहरु नगर, विजापुर रोड, सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उप संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री. गंगाधर कुं. म्हमाणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहायक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री. वसंत मार्तंड गायकवाड | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

अंजुमने तरगीबे ताआलीम (शिक्षण प्रसारक मंडळ, अक्कलकोट ) या संस्थेत इम्रान इसमोद्दीन गोलंदाज यांची नियुक्ती बार्शी उच्च माध्यमिक विद्यालयात झालेली आहे. नियुक्तीबाबत केलेल्या तक्रारी अर्जावर काय कार्यवाही झाली याची माहिती. शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणुकीस कोणत्या सालापासून बंदी आहे याची माहिती व बंदीच्या शासन निर्णयाची प्रत. अनधिकृत विश्वस्तांना सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांनी विश्वस्त म्हणून मान्यता दिली नाही. अशा अनधिकृत विश्वस्तांना ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षक नियुक्ती करता येते काय याची माहिती. शासकीय माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नावानिशी माहिती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मुल्ला महिबुब अप्पाभाई यांनी अंजुमने तरगीबे ताआलीम (शिक्षण प्रसारक मंडळ अक्कलकोट ) या संस्थेतील श्री. इम्रान इसमोद्दीन गोलंदाज यांची नेमणूक व त्या अनुषंगाने

शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणुकीला असलेली बंदी, संस्थेच्या विश्वस्तांचे अधिकृतपण या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत उत्तर दिले. त्याविरुध्द श्री मुल्ला यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उप संचालक, विभागीय उप संचालक कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. मुद्दा क्र. १ व ३ मधील माहिती जाणूनबुजून चुकीची व दिशाभूल करणारी दिली, असे अपीलकर्त्याने अपिलात म्हटले आहे. तसेच विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे कायद्याचा भंग झाल्याचा आरोप करुन दंडात्मक कारवाईची मागणी त्यांनी प्रथम अपिलात केली आहे. अपिलीय प्राधिका-यांनी या अपिलाची दखल घेतली नाही म्हणून श्री. मुल्ला यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आईच्या गंभीर आजारपणामुळे राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीच्या वेळी दि. ७.८.२००७ रोजी आपण उपस्थित राहू शकत नसल्याचे कळवून श्री. मुल्ला यांनी सुनावणीसाठी एक महिन्यानंतरची तारीख देण्याची विनंती केली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे सुनावणीस उपस्थित होते. या दोघांनीही या नव्या पदांचा कार्यभार अलीकडेच स्वीकारलेला आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. एम.व्ही. गोसावी यांची अन्यत्र बदली झाली आहे, तर तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. टी. एन. लोंढे हे निवृत्त झाले आहेत. अपीलकर्ता हे अनुपस्थित असले तरी लेखी निवेदन सादर करण्यासाठी त्यांना पुरेशी मुदत उपलब्ध होती. ते त्यांनी केलेले नाही. संबंधित संस्थेच्या अंतर्गत वादातून या प्रकारचे परस्परांविरुध्द अनेक अर्ज व न्यायालयातील प्रकरणे चालू आहेत. त्यामुळे वादग्रस्त मुद्दयांबाबत शिक्षण उपसंचालक कार्यालय निर्णायक विधाने करु शकत नाही, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रातून व त्यांच्या निवेदनांतून दिसून येते.

जन माहिती अधिका-यानी विहित मुदतीत माहिती दिली नाही व चुकीची, अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिली, असा श्री. मुल्ला यांचा आक्षेप आहे. परंतु श्री. मुल्ला यांच्या दि. ८.१२.२००५च्या अर्जाला जन माहिती अधिका-यांनी दि. ६.१.२००६ रोजी उत्तर दिले आहे. त्यात चारही मुद्दयांची माहिती दिली आहे. मुद्दा क्र. १ व ३ ची माहिती दिशाभूल करणारी नसून संस्थेअंतर्गत

वाद व चालू असलेली न्यायालयीन प्रकरणे लक्षात घेऊन, व शिक्षण उप संचालक कार्यालयाच्या कार्यकक्षेचा विचार करुन दिली आहे, असे, जन माहिती अधिकारी श्री. वसंत मार्तंड गायकवाड व अपिलीय प्राधिकारी श्री. गंगाधर कुं. म्हमाणे यांनी स्पष्ट केले. हे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे. विश्वस्त अधिकृत की अनधिकृत हे ठरविण्याचे अधिकार शिक्षण उप संचालक कार्यालयाचे नाहीत, त्यामुळे त्यावर त्यांनी भाष्य केले नाही हे योग्य आहे. मात्र तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. लोंढे यांनी प्रथम अपिलाची दखल घेणे आवश्यक होते, ते केले नाही, हा अपीलकर्त्याचा आक्षेप रास्त आहे. मात्र दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार अपिलीय प्राधिकाऱ्यांना नाही, राज्य माहिती आयोग त्यासाठी सक्षम आहे, याची अपीलकर्त्यांने नोंद घ्यावी.

विषयाचा संदर्भ, पार्श्वभूमी व अनुषंगिक कागदपत्रे पाहता आयोगाला अधिक सुनावणीची आवश्यकता वाटत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. ९.८.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. लक्ष्मण विठोबा डोईफोडे
मु. पो.नरखेड, ता.मोहोळ, जि. सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) वि.क्र.१,
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (श्रेणी-१),
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग, मोहोळ, जि. सोलापूर
श्री. पंढरीनाथ बाबूराव भोसले

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७ /८/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ उपस्थित | | |
| **अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) वि.क्र.१, जिल्हा परिषद, सोलापूर तर्फे प्रतिनिधी श्री. मधूकर केरु गोडगे, अधीक्षक, पंचायत समिती, मोहोळ, जि. सोलापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता (श्रेणी-१), लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग मोहोळ, जि. सोलापूर श्री. पंढरीनाथ बाबूराव भोसले | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**<br><br>ऑक्टोबर २००३ ते २००५ या कालावधीत नरखेड हद्दीतील रोजगार हमी योजना अंतर्गत २ पाझर तलाव, १ गाळ काढणे तलाव व पवारवाडी हद्द २ पाझर तलाव, बोपले हद्दीतील २ पाझर तलाव यावरील एकूण मंजूर रक्कम, खर्च झालेली रक्कम व शिल्लक आणि हजेरी पत्रकाच्या झेरॉक्स प्रती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. लक्ष्मण विठोबा डोईफोडे यांनी नरखेड, पवारवाडी व बोपले हद्दीतील रोजगार हमी योजनेअंतर्गत पाझर तलावांच्या कामावर झालेला एकूण खर्च व हजेरी पत्रकाच्या छायांकित प्रती अशी माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (श्रेणी १), लघुपाटबंधारे (स्था.स्तर), उपविभाग मोहोळ यांच्याकडे मागितली होती. त्यांच्याकडून माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), वि.क्र.१, जिल्हा

परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले होते. त्यांच्याकडूनही अपिलाची दखल घेतली गेली नाही म्हणून श्री. डोईफोडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दरम्यानच्या काळात तालुका स्तरावरील माहिती अधिकारी म्हणून तालुक्याचे उपअभियंता व अपिलीय प्राधिकारी म्हणून गटविकास अधिकारी यांची नियुक्ती करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी काढले होते. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांच्याकडून आपल्याला आवश्यक असलेली माहिती मिळाली त्यामुळे आपली तक्रार राहिली नसल्याचे श्री. डोईफोडे यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. ९.८.२००७